**ठळक बातम्या**

केंद्र- राज्य शाश्वत संवादासाठी सर्व राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांच्या मुख्य सचिवांची राष्ट्रीय परिषद प्रधानमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली सुरु

राष्ट्रपती द्रौपदी मूर्मू आजपासून गोवा, कर्नाटक आणि झारखंडच्या दौऱ्यावर

दहशतवाद हा मानवतेचा सर्वात मोठा शत्रू असून त्याविरोधात एकजुटीनं लढणं गरजेचं आहे, असं केंद्रीय गृहमंत्र्यांचं आवाहन

विकसित भारत जीरामजी कायद्याविरोधात आंदोलनाचा काँग्रेसचा इशारा

आणि
युक्रेनची राजधानी किव वर रशियाचा हल्ला

<><><><><>

देशातली सर्व राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांच्या मुख्य सचिवांची पाचवी राष्ट्रीय परिषद कालपासून सुरू झाली. तीन दिवस चालणाऱ्या या बैठकीचं अध्यक्षपद प्रधानमंत्री नरेंद्र मोदी भूषवत असून ते आज आणि उद्या परिषदेला उपस्थित राहतील. राष्ट्रीय विकासासाठी रचनात्मक आणि शाश्वत संवादाच्या माध्यमातून केंद्र आणि राज्याची भागीदारी मजबूत करण्यासाठी ही परिषद महत्त्वाची मानली जात आहे. यावर्षी या परिषदेचा मुख्य विषय 'विकसित भारतासाठी मनुष्यबळाचं भांडवल' असा असून यात राज्यं आणि केंद्र शासित प्रदेशांसाठी सर्वोत्तम कार्यपद्धती आणि धोरणांवर लक्ष केंद्रित करण्यात येत आहे. या विषयांतर्गत प्रामुख्यानं शालेय पूर्व शिक्षण, शालेय शिक्षण, कौशल्य विकास, उच्च शिक्षण तसंच क्रीडा आणि अतिरिक्त उपक्रम या क्षेत्रांवर विशेष भर दिला जाणार आहे.

प्रशासनात तंत्रज्ञान, संधी, जोखीम आणि समाधान ,जागतिक पुरवठासाखळी, आत्मनिर्भर भारत आणि स्वदेशी, तसंच अतिरेकी डाव्या विचारसरणीच्या बीमोडानंतरचा भविष्यकाळ या विषयांवर परिषदेत विचारविमर्श होणार आहे.

<><><><><>

राष्ट्रपती द्रौपदी मूर्मू आजपासून गोवा, कर्नाटक आणि झारखंडच्या दौऱ्यावर जाणार आहेत. आज संध्याकाळी त्या दौऱ्याची सुरुवात गोव्यापासून करतील. उद्या कर्नाटकात

कारवार इथं समुद्र- सफर करतील. सोमवारी राष्ट्रपती जमशेदपूरमध्ये ‘ओल चिकी’ लिपीच्या शताब्दी समारंभात सहभागी होतील. या लिपीची निर्मिती १९२५ मध्ये रघुनाथ मुर्मू यांनी संथाली भाषेसाठी केली होती. ही लिपी संथाल आदिवासी समुदायासाठी संस्कृती, साहित्य आणि आदिवासी वारशाच्या संदर्भात खूप महत्त्वपूर्ण आहे. त्याच दिवशी राष्ट्रपती एन.आय.टी. जमशेदपूरच्या १५ व्या दीक्षांत समारोहाला संबोधित करतील. मंगळवारी राष्ट्रपती झारखंडच्या गुमला इथं कार्तिक यात्रेला संबोधित करतील.

<><><><><>

दहशतवाद हा मानवतेचा सर्वात मोठा शत्रू असून त्याविरोधात एकजुटीनं लढणं गरजेचं आहे, असं आवाहन केंद्रिय गृहमंत्री अमित शहा यांनी केलं. देशातला दहशतवाद निपटून काढण्यासाठी केंद्र सरकार कठोर पावलं उचलत आहे, असंही त्यांनी सांगितलं. राष्ट्रीय तपास यंत्रणा अर्थात एनआयएतर्फे आयोजित दहशतवादविरोधी परिषदेचं उद्घघाटन काल शहा यांच्या हस्ते झालं, त्यावेळी ते बोलत होते. दहशतवादविरोधी कारवाईत योगदान देणाऱ्या राष्ट्रीय तपास संस्था-एनआयएच्या ९ कर्मचाऱ्यांचा शहा यांच्या हस्ते सेवा पदक आणि वीरपदक देऊन गौरव करण्यात आला.

<><><><><>

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी श्री गुरु गोविंद सिंहजींच्या पवित्र प्रकाश पर्वानिमित्त, शुभेच्छा दिल्या आहेत. श्री गुरु गोविंद सिंहजी हे अदम्य धैर्य आणि विलक्षण बुद्धिमत्तेचे प्रतीक होते. त्यांनी लोकांना नीतिमान जीवन जगण्यासाठी प्रेरित केलं आणि न्याय तसंच आत्मसन्मानाच्या रक्षणासाठी आपल्या अनुयायांमध्ये प्रचंड ऊर्जा निर्माण केली असं राष्ट्रपतींनी आपल्या संदेशात म्हटलं आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी श्री गुरु गोविंद सिंहजी यांच्या पवित्र प्रकाश उत्सवानिमित्त, त्यांना आदरांजली वाहिली. श्री गुरु गोविंद सिंहजी हे धैर्य, करुणा आणि बलिदानाचे मूर्त स्वरूप आहेत. त्यांचे जीवन आणि शिकवण आपल्याला सत्य, न्याय, धार्मिकतेसाठी आणि मानवी प्रतिष्ठेचे रक्षण करण्यासाठी प्रेरित करते, असं प्रधानमंत्र्यांनी शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे.

<><><><><>

विकसित भारताच्या उद्देशानं केंद्रसरकारनं विविध उपक्रम राबवले आहेत ऐकूया कररचनेत यंदा झालेल्या बदलांबद्दल..

**- - -व्हॉईस कास्ट- कौस्तुभ - - -**

*(विकसित भारताचं लक्ष्य समोर ठेवून कररचनेमध्ये केलेल्या बदलांसाठी 2025 हे वर्ष लक्षणीय ठरलं आहे. भारतीय करांचा प्रवास मीठावरील करासाठी महात्मा गांधींनी केलेल्या मीठाच्या सत्याग्रहापासून सुरू होतो. सुमारे 50 वर्षांपूर्वी प्राप्तीकरामध्ये भरमसाठ वाढ झाल्यामुळे करचुकवेगिरीत वाढ झाली होती. मात्र वस्तु आणि सेवा कराच्या अंमलबजावणीमुळे वेगवेगळ्या टप्प्यावरची कर आकारणी बंद झाली आहे. या वर्षी 18 टक्के कराची मर्यादा 5 टक्क्यांपर्यंत कमी करण्यानंतर नागरिकांच्या मनात विश्वासाची भावना निर्माण झाली आहे. या वर्षी दिवाळीमध्ये नागरिकांनी केलेली भरभरून खरेदी आणि त्यातून जमा झालेला महसूल हे त्याचंच प्रतीक आहे. रोजच्या वापरातील वस्तु आणि विम्यावर शून्य कर यामुळे सामान्य नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे.)*

**<><><><><>**

मनरेगा कायद्या ऐवजी ‘व्हीबी जी राम जी’ हा कायदा आणून केंद्र सरकारने गरीबांच्या पोटावर पाय दिला असल्याची टीका करत काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी ‘जी राम जी’ विरोधात आंदोलन उभारण्याचा इशारा दिला. नवी दिल्ली इथं आज काँग्रेस कार्यकारिणीची बैठक झाली, त्यात ‘जी राम जी’ कायद्यासह इतर मुद्द्यांवर चर्चा झाली. या पार्श्वभूमीवर खरगे यांनी हे विधान केलं आहे. मनरेगाने ग्रामीण भागाचा चेहरामोहरा बदलला, हा जगातला सर्वात मोठा ग्रामीण रोजगार उपक्रम होता, दलित, आदिवासी, महिला आणि भूमीहीन नागरिकांना याचा मोठा आधार होता, असं खरगे म्हणाले. त्यामुळे मनरेगा रद्द करून कोट्यवधी गरीब जनतेला निराधार केल्याचा आरोप त्यांनी केला. कार्यकारिणीच्या बैठकीत बांगलादेशात हिंदू अल्पसंख्यकांवर होणाऱ्या हल्ल्यांचा निषेध करण्यात आला. तसंच मतदारयाद्यांच्या सखोल पुनरीक्षण मोहिमेबद्दल चर्चा झाली. मतदारांची नावं वगळली जाणार नाहीत याची काळजी काँग्रेस कार्यकर्त्यांनी घ्यावी असं आवाहनही खरगे यांनी केलं. या बैठकीला काँग्रेस संसदीय पक्षाच्या नेत्या सोनिया गांधी, लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी उपस्थित होते.

**<><><><><>**

अल कायदा ही दहशतवादी संघटना, संपर्कासाठी, अफगाणिस्तानातले सर्व्हर्स आणि नियंत्रण कक्ष वापरत असल्याचं महाराष्ट्र पोलिसांच्या दहशतवादविरोधी पथकाच्या तपासात उघड झालं आहे. अल कायदाशी संबंधांच्या आरोपावरुन पकडलेल्या झुबेर हंगर-गेकरच्या चौकशीत ही माहिती मिळाल्याचं सूत्रांनी सांगितलं.

त्याच्याकडून जप्त केलेल्या इलेक्ट्रॉनिक उपकरणांमधे अफगाणिस्तान आणि हाँगकाँग मधून विविध बनावट नावांचा उल्लेख आढळला आहे. संपर्क लपवण्यासाठी हाँगकाँगचा वापर केला असून पाकिस्तान, सौदी अरेबिया, कुवैत, आणि ओमानमधले त्याचे संपर्कही कसून तपासण्यात येत आहेत.

<><><><><>

रशियाने आज पहाटे युक्रेनची राजधानी किव वर भीषण हल्ला केला. रशियानं अनेक किंझल हायपरसोनिक क्षेपणास्त्र, चार इस्कंडर बलास्टिक क्षेपणास्त्र आणि कलिबर क्रूज क्षेपणास्त्र डागली, असं वृत्त माध्यमांनी दिलं आहे. कीव आणि आसपास स्फोटांचे आवाज ऐकू येत होते आणि किवचं उपनगर असलेल्या ब्रोवरी आणि आसपासच्या भागातला वीजपुरवठा बंद झाला होता.

युद्धसमाप्तीच्या उद्देशाने आवश्यक सामंजस्यावर चर्चेसाठी युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष वोलोदिमिर झेलेन्स्की आणि अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यात उद्या फ्लोरिडा इथं बैठक होणार आहे. त्याच्या एक दिवस अगोदर हा हल्ला झाला.

<><><><><>

सोमालियापासून विलग झालेलं क्षेत्र ‘सोमाली-लँडला’ स्वतंत्र राष्ट्र म्हणून औपचारिक पद्धतीनं  मान्यता देणारा इस्त्रायल हा पहिला देश ठरला आहे. इस्त्रायलचे प्रधानमंत्री बिन्यामिन नेतन्याहू म्हणाले की, कृषी, आरोग्य आणि तंत्रज्ञान क्षेत्रात सहकार्य त्वरित वाढवण्यास इस्त्रायल इच्छुक आहे. सोमाली-लँडचे राष्ट्रपती अब्दिरहमान मोहम्मद अब्दुल्लाही यांनी हा ऐतिहासिक क्षण असल्याचं म्हटलं आहे.

मात्र, इस्त्रायलनं सोमालियाच्या सार्वभौमत्वात जाणीवपूर्वक केलेला हस्तक्षेप मान्य नसल्याचे सोमालियाचे प्रधानमंत्री हमजा अब्दी बर्रे यांनी म्हटलं आहे.

दरम्यान, आफ्रिकी संघ आयोगाचे अध्यक्ष महमूद अली युसूफ यांनी सोमालीलँडला दिलेली कोणत्याही प्रकारची मान्यता फेटाळली आहे. सोमालीलँडसंदर्भात अलीकडे घडलेल्या घटनाक्रमांबद्दल त्यांनी चिंता व्यक्त केली आहे.

**<><><><><>**

बांगलादेशातल्या फरीदपूर इथं प्रसिद्ध रॉक संगीतकार जेम्स बाऊलच्या कार्यक्रमात झालेल्या गदारोळाला हिंसक वळण लागलं. यात २५ जण जखमी झाले. या घटनेनंतर हा कार्यक्रम रद्द करण्यात आला. एका शाळेत हा कार्यक्रम होत असताना बाहेरुन काही अज्ञात हल्लेखोरांनी दगड-विटा फेकून कार्यक्रमात घुसण्याचा प्रयत्न केला. विद्यार्थ्यांनी प्रतिकार केला. कायदा सुव्यवस्था बिघडत असल्याचं लक्षात येताच जिल्हा प्रशासनानं आयोजकांना कार्यक्रम रद्द करण्याचे आदेश दिले.

**//<><><><><>//**